# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः05.08.2024** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू फिजी, न्यूझीलंड आणि पूर्व तिमोर देशांच्या दौऱ्यावर रवाना
2. देशात विक्रमी इंधन वायू उत्पादन, पंतप्रधानांकडून प्रशंसा
3. आरक्षणाच्या मुद्द्यावरून बांगलादेशात पुन्हा हिंसाचाराचा उद्रेक
4. पन्नास षटकांच्या दुसऱ्या सामन्यात यजमान श्रीलंकेची भारतावर मात आणि
5. महाराष्ट्रात पुण्यासह अन्य भागात जोरदार पाऊस, पूरस्थितीमुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू काल फिजी, न्यूझीलंड आणि पूर्व तिमोर या तीन देशांच्या दौऱ्यावर रवाना झाल्या. 7 ऑगस्टपर्यंतच्या फिजी दौऱ्यात त्या फिजीचे राष्ट्राध्यक्ष कॅटोनिवर आणि पंतप्रधान सिटिवेनी रबुका यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. फिजीच्या संसदेतही राष्ट्रपतींचं भाषण होणार असून नंतर त्या तिथल्या भारतीयांशीदेखील संवाद साधतील. भारत हा फिजीच्या विकासातला महत्त्वाचा भागीदार आहे. राष्ट्रपती मुर्मू 8 आणि 9 ऑगस्टला न्यूझीलंडला भेट देणार आहेत. या दौऱ्यात त्या तिथल्या राष्ट्रप्रमुखांशी आणि पंतप्रधानांशी चर्चा करण्यासह वेलिंग्टन इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत भाषण करतील. 10 ऑगस्टला राष्ट्रपती मुर्मू पूर्व तिमोरचे राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधानांसोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

वायू उत्पादन

विकसित भारताचं उद्दीष्ट साध्य करण्याच्या दृष्टीनं उर्जा क्षेत्रातलं स्वावलंबन अतिशय महत्त्वाचं आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. देशानं इंधन वायू उत्पादनाच्या क्षेत्रात नवा उच्चांक गाठल्याचं पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान मोदी यांनी विक्रमी वायू उत्पादनाबद्दल देशवासियांचं अभिनंदन केलं. हे विक्रमी उत्पादन विकसित भारत निर्मितीसाठी सरकार वचनबद्ध असल्याचा प्रत्यक्ष पुरावा असल्याचं त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. 2020-21 मध्ये नैसर्गिक वायूचं उत्पादन सुमारे 29 दशलक्ष घनमीटर झालं होतं. ते 2023-24 मध्ये 37 दशलक्ष घनमीटर झालं आणि 2026 पर्यंत सुमारे 45 दशलक्ष घनमीटर इतकं होणं अपेक्षित आहे अशी माहिती पेट्रोलियम मंत्र्यांनी दिली आहे.

**शहा-कायदे**

लोकांना जलद आणि वेळेत न्याय मिळवून देण्याच्या दिशेनं देशातली न्याय यंत्रणा लवकरच मोठा टप्पा पार करेल असा विश्वास केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला आहे. ते काल चंदीगड इथं न्याय सेतू, न्याय श्रुती, इ-पुरावा आणि इ-समन यंत्रणांच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. नवीन गुन्हेगारी कायदे आपल्या राज्यघटनेशी सुसंगत असून लोकांना शिक्षा सुनावण्यापेक्षा न्याय देण्यावर भर देणारे आहेत असं अमित शहा म्हणाले.

**संरक्षण-वित्त**

लष्कराच्या तिनही दलांची आर्थिक परिषद आज नवी दिल्लीत होणार आहे. लष्करी दलांमधला आर्थिक मुद्द्यांबाबतचा ताळमेळ आणि समन्वय वाढवण्याच्या हेतूनं एकात्मिक संरक्षण विभागाच्या मुख्यालयानं ही परिषद आयोजित केली आहे.

सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या उच्चस्तरीय परिषदेत संरक्षण मंत्रालयातले वरीष्ठ अधिकारी, संरक्षण लेखा विभागाचे वरीष्ठ अधिकारी सहभागी होतील. संरक्षण विभागाच्या आर्थिक बाबींशी संबंधित विविध घटकांचा दृष्टीकोन समजून घेणं आणि संरक्षण सामग्री खरेदीतल्या समस्यांवर तोडगा शोधणं अशा मुद्द्यांवर या परिषदेत विचारविनिमय होणार आहे.

**<u>संसद</u>**

लोकसभेत आज आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या अखत्यारितल्या 2024-25 साठीच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होईल. गोव्याच्या विधानसभेत अनुसूचित जमातींचं प्रतिनिधीत्व सुधारण्याबाबतचं विधेयकही सादर होणं अपेक्षित आहे. राज्यसभेत तेलक्षेत्र नियमन आणि विकास सुधारणा विधेयक सादर होणार असून कृषी मंत्रालयाच्या कामकाजाबाबतही चर्चा होण्याची शक्यता आहे.

**<u>कलम-370</u>**

जम्मू आणि काश्मीर मधून कलम 370 रद्द करण्यात आलं त्याला आज 5 वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर जम्मू जिल्ह्यातील अखनूर भागात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वतोपरी सुरक्षाउपाय करण्यात येत असून सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश दिले असल्याचं जम्मू चे पोलिस अधीक्षक अजय शर्मा यांनी सांगितलं आहे.

**<u>बांग्लादेश हिंसा</u>**

बांग्लादेशात पुन्हा एकदा हिंसाचार उफाळला आहे. विद्यार्थी निदर्शक, आंदोलक, पोलिस आणि सत्ताधारी पक्ष समर्थक संघटनांच्या कार्यकर्त्यांदरम्यान काल झालेल्या संघर्षाला हिंसक वळण लागलं. त्यात 13 पोलिस कर्मचाऱ्यांसह 90 जण ठार झाले तर अनेक जण जखमी झाले. भेदभावविरोधी विद्यार्थी आंदोलनाच्या नेत्यांनी काल राष्ट्रव्यापी असहकार आंदोलन सुरू केलं असून, शेख हसीना सरकारच्या राजीनाम्याची मागणीचा आग्रह धरला आहे. सरकारनं काल ढाका आणि देशातल्या अन्य भागात अनिश्चित काळासाठी संचारबंदीची घोषणा केली आहे. सरकारनं आंदोलकांच्या सुरक्षिततेसाठी आजपासून तीन दिवस सार्वजनिक सुटीची घोषणा केली आहे. दरम्यान, पंतप्रधान शेख हसीना यांनी पंतप्रधान निवासस्थानी राष्ट्रीय सुरक्षा समितीची बैठक घेतली.

**<u>परराष्ट्र मंत्रालय-बांग्लादेश</u>**

दरम्यान, भारतीय नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत बांग्लादेशात प्रवास करणं टाळावं असं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं आहे. बांग्लादेशातल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयानं ही सूचना केली आहे. सध्या बांग्लादेशात असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत खबरदारी घ्यावी आणि राहतं ठिकाण सोडणं टाळावं तसंच ढाक्यातल्या भारतीय उच्चायुक्तालयाच्या संपर्कात राहावं असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>वायनाड</u>**

केरळमध्ये वायनाड इथं लष्कराच्या नेतृत्वातली शोधमोहीम काल सहाव्या दिवशीही सुरू होती. निलांबर इथं ढिगाऱ्याखालून एका व्यक्तीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला तर सूचिप्परा धबधब्याच्या परिसरात एका व्यक्तीचे अवयव सापडले. मृतदेहांचा शोध घेण्यासाठी अधिकारी गाडले गेलेले अवशेष शोधू शकणारी ड्रोन तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा वापरत आहेत. भूस्खलनानंतर त्या भागात झालेल्या बदलांचा अभ्यास करण्यासाठी डोंगर उतार दर्शवणारे नकाशेही तयार करण्यात आले आहेत.

**<u>हिमाचल ढगफुटी</u>**

हिमाचल प्रदेशमध्ये नुकत्याच झालेल्या ढगफुटीनंतर तिथं बेपत्ता नागरिकांचा युद्धपातळीवर शोध घेतला जात आहे. काल मंडी जिल्ह्यात दोन आणि शिमला जिल्ह्यात एका व्यक्तीचा मृतदेह सापडला. शिमला, मंडी आणि कुलु जिल्ह्यांना या ढगफुटीचा

फटका बसला असून 42 बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्याचं काम अद्यापही सुरू आहे. पुराच्या पाण्याबरोबर वाहत आलेल्या दरडीखाली नागरिक अडकल्याची शक्यता लक्षात घेऊन तिथंही शोध घेतला जात आहे.

**ऑलिम्पिक**

पॅरीस ऑलिम्पिकमध्ये, भारतीय हॉकी संघानं काल पेनल्टी शूट आउटमध्ये ब्रिटनला 4-2 अशी मात देत उपांत्य फेरीत धडक मारली. दरम्यान, बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेनला उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागला.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यात काल झालेल्या 50 षटकांच्या क्रिकेट सामन्यात श्रीलंकेनं भारताचा 32 धावांनी पराभव करत मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली. श्रीलंकेनं प्रथम फलंदाजी करत विजयासाठी 241 धावाचं लक्ष्य भारतासमोर ठेवलं होतं. प्रत्युत्तरादाखल भारतीय संघ 208 धावाच करु शकला. श्रीलंकेच्या जेफ्री व्हॅंडरसनने भारताचे प्रमुख सहा गडी बाद केले.

**पुणे पाऊस**

महाराष्ट्रात काल पुण्यासह अन्य काही जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला. पुणे शहर आणि जिल्ह्याच्या काही भागाला काल पुन्हा जोरदार पावसानं झोडपून काढलं. खडकवासला धरणसाखळी क्षेत्रात पावसाचा जोर कायम होता. धरणातून मुठा नदीमध्ये सकाळपासून टप्प्याटप्प्यानं पाण्याचा विसर्ग सुरू होता. सिंहगड रस्त्यावरील एकतानगर, निंबज नगरसह येरवड्यातील शांतीनगर, आदर्शनगर इथंही पाण्याची पातळी वाढल्यानं अग्निशमन दलानं या भागातील अनेक नागरिकांची सुखरूप सुटका केली. तसंच या परिसरात लष्कराची तुकडीही तैनात करण्यात आली होती.

पुण्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला सतर्क राहाण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवणे, निवारा, जेवणाची व्यवस्था करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनीही पूरपरिस्थितीचा आढावा घेतला आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

पिंपरी चिंचवड शहर तसंच धरण क्षेत्रातल्या संततधार पावसामुळे, धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्यानं महापालिका आयुक्तांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्षतेचे आदेश दिले. नदीकाठी बचाव यंत्रणा तसंच राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडी सज्ज ठेवण्यात आली आहे. संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरातल्या विविध भागातल्या एक हजार नागरिकांना काल निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आलं.

राज्याच्या अन्य जिल्ह्यांमध्येही जोरदार पाऊस सुरू असून अनेक धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्यानं पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदी काठच्या गावातील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा संबंधित जिल्हा प्रशासनानं दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.